# प्रकरण V

# कामांची अंमलबजावणी

# प्रकरण V

# कामांची अंमलबजावणी

## 5.1 कामांची अंमलबजावणी

ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला मागणीनुसार एका आर्थिक वर्षात 100 दिवसांचा हमी रोजगार उपलब्ध करून देणे, परिणामी विहित गुणवत्तेची आणि टिकाऊ उत्पादक मालमत्ता निर्माण करणे आणि गरिबांच्या उपजीविकेचा स्त्रोत आधार बळकट करणे हे या योजनेचे मूलभूत उद्दिष्ट आहे.

ही योजना टिकाऊ, स्थानिक पातळीवर संबंधित आणि समाजासाठी हितकारक मालमत्ता तयार करण्यावर लक्ष केंद्रित करते. उपयुक्त मालमत्ता निर्मितीला प्राधान्य देऊन ही योजना ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करते, कृषी उत्पादकता वाढवते आणि शाश्वत विकासास मदत करते, ज्यामुळे ग्रामीण परिवर्तन आणि सामाजिक उन्नतीसाठी हे एक महत्त्वपूर्ण साधन बनते. अमूर्त, मोजण्याजोगी नसलेली आणि पुनरावृत्ती स्वरूपाची कामे या योजनेंतर्गत समाविष्ट करता येणार नाहीत.

## 5.2 कामांची वर्गवारी

या योजनेचा भर खालील चार वर्गवारींमध्ये विभागलेल्या कामांवर केंद्रीत आहे.

- वर्गवारी अ — •नैसर्गिक संसाधन व्यवस्थापनाशी संबंधित सार्वजनिक कामे
- वर्गवारी ब — •अत्यंत दुर्बल घटकांसाठी सामुदायिक मालमत्ता किंवा वैयक्तिक मालमत्ता
- वर्गवारी क — •राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान अनुरूप स्वयं सहायता गटांसाठी देखील सामान्य पायाभूत सुविधा
- वर्गवारी ड — •ग्रामीण पायाभूत सुविधा

या योजनेंतर्गत या चार श्रेणींची 266 प्रकारच्या अनुज्ञेय कामांमध्ये विभागणी करण्यात आली.

## 5.3 राज्यातील व निवडलेल्या जिल्ह्यांतील कामांची स्थिती

राज्यात 2019-20 ते 2023-24 दरम्यान मंजूर झालेल्या कामांची स्थिती **तक्ता 5.1** मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता 5.1: 2019-20 ते 2023-24 दरम्यान मंजूर झालेल्या कामांची स्थिती**

| वर्ष | मंजूरी मिळालेली नवीन कामे | पूर्ण झालेल्या कामांची संख्या (टक्के) | पूर्ण झालेल्या कामांवर झालेला खर्च (₹ कोटींत) | अपूर्ण कामांची संख्या (टक्के) | अपूर्ण कामांवर झालेला खर्च (₹ कोटींत) | सुरू न झालेल्या कामांची संख्या (टक्के) |
|---|---|---|---|---|---|---|
| **2019-20** | 3,20,636 | 2,61,584 (82) | 1,158.87 | 13,851(4) | 137.80 | 45,201(14) |
| **2020-21** | 4,57,873 | 3,70,655(81) | 1,204.16 | 26,827(6) | 260.62 | 60,391(13) |
| **2021-22** | 5,28,983 | 3,20,039(61) | 1,913.59 | 66,098(12) | 764.23 | 1,42,846(27) |
| **2022-23** | 5,08,623 | 2,28,844(45) | 1,244.87 | 1,30,094(26) | 1,213.86 | 1,49,685(29) |
| **2023-24** | 7,56,314 | 1,77,428(23) | 1,204.16 | 2,66,516(35) | 2,984.51 | 3,12,370(41) |
| **एकूण** | **25,72,429** | **13,58,550 (52.81)** | **6,725.65** | **5,03,386 (19.57)** | **5,361.02** | **7,10,493 (27.62)** |

*स्त्रोत: आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी मार्च 2025 मध्ये सादर केलेली माहिती*

2019-20 ते 2023-24 दरम्यान सहा जिल्ह्यांमध्ये मंजूर झालेल्या कामांची स्थिती **तक्ता 5.2** मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता 5.2: 2019-20 ते 2023-24 दरम्यान निवडलेल्या सहा जिल्ह्यांतील मंजूर कामांची स्थिती**

| वर्ष | मंजूरी मिळालेली नवीन कामे | पूर्ण झालेल्या कामांची संख्या (टक्के) | अपूर्ण कामांची संख्या (टक्के) | अपूर्ण कामांवर झालेला खर्च (कोटींत) | सुरू न झालेल्या कामांची संख्या (टक्के) |
|---|---|---|---|---|---|
| **2019-20** | 79,509 | 64,949(82) | 2,922(4) | 31.28 | 11,638(15) |
| **2020-21** | 89,404 | 70,552(79) | 4,967(6) | 75.60 | 13,885(16) |
| **2021-22** | 95,717 | 60,252(63) | 14,482(15) | 209.60 | 20,983(22) |
| **2022-23** | 1,06,073 | 51,883(49) | 28,345(27) | 327.27 | 25,845(24) |
| **2023-24** | 1,96,571 | 42,045(21) | 73,571(37) | 898.99 | 80,955(41) |
| **एकूण** | **5,67,274** | **2,89,681(51)** | **1,24,287(22)** | **1,408.74** | **1,53,306(27)** |

*स्त्रोत: आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी मार्च 2025 मध्ये सादर केलेली माहिती*

### 5.3.1 अपूर्ण कामे

**तक्ता 5.1** मध्ये दर्शविल्याप्रमाणे ज्यात 2019-20 ते 2023-24 दरम्यान मंजूर झालेली 5.03 लाख (19.57 टक्के) कामे मार्च 2025 पर्यंत अपूर्ण होती, त्यापैकी 1.07 लाख (21 टक्के) कामे तीन वर्षांहून[1] अधिक काळ प्रलंबित होती. अपूर्ण कामे प्रामुख्याने वैयक्तिक लाभार्थ्यांना[2] सिंचन सुविधा पुरविणे, दुष्काळ निवारणाची कामे, ग्रामीण रस्ते जोडणीची कामे आदींशी संबंधित आहेत. तसेच 2005-06 ते 2018-19 या कालावधीतील 3.03 लाख कामे अपूर्ण आहेत. त्यामुळे 8.06 लाख कामे अपूर्ण होती.

---

1 योजनेंतर्गत हाती घेतलेली कामे पूर्ण करण्याचा कमाल कालावधी तीन वर्षांचा होता.

2 या योजनेंतर्गत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती, अधिसूचित जमाती इत्यादींशी संबंधित व्यक्तींच्या मालकीच्या जमिनींवर विहीर बांधणे, गुरांसाठी शेड बांधणे, शेत तळी बांधण्यासाठी, रेशीम किड्यांची शेती, फळझाडांची लागवड करणे इत्यादी कामे.

चाचणी तपासणी केलेल्या सहा जिल्ह्यांत (**तक्ता 5.2**) 2019-20 ते 2023-24 दरम्यान मंजूर झालेली 1.24 लाख (22 टक्के) कामे मार्च 2025 पर्यंत अपूर्ण होती, त्यापैकी 0.22 लाख कामे (18 टक्के) तीन वर्षांहून अधिक काळ प्रलंबित होती.

चाचणी तपासणी केलेल्या 336 कामांचे अभिलेखे पडताळले असता डिसेंबर 2017 ते मार्च 2023 दरम्यान सुरू झालेली ₹ 244.76 लाखांची 64 कामे (19 टक्के) पूर्ण होणे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले. या 336 कामांपैकी 39 कामे (12 टक्के) ज्यावर ₹ 1.64 कोटी खर्च झाले आहेत, ती गेल्या 12 महिन्यांपासून ते पाच वर्षांपासून स्थगित असल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले.

उप जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजी नगर, यांनी नमूद केले की (ऑगस्ट 2024), बहुतेक अपूर्ण कामांवरील खर्च मंजूर झालेल्या खर्चाच्या 30 टक्क्यांपेक्षा कमी होता आणि म्हणूनच नरेगासॉफ्टमध्ये बंद करता येत नाहीत. काही कामे भौतिकदृष्टीने पूर्ण झाली असली तरी मालाची देयके थकीत असल्याने कामे सुरू असल्याचे दर्शविण्यात येते. उत्तरादाखल आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी नमूद केले (जून 2025) की, राज्य शासनाच्या निर्देशानुसार (मे 2025) कामे मुदतीत पूर्ण करण्याच्या सूचना जिल्ह्यांना देण्यात आल्या आहेत.

(i) अपूर्ण कामांमध्ये फलोत्पादन कार्यक्रमांतर्गत हाती घेतलेली कामेही समाविष्ट आहेत जी वैयक्तिक लाभार्थ्यांचे[3] उत्पन्न वाढविण्यासाठी आणि त्यांचे राहणीमान उंचाविण्याच्या उद्देशाने हाती घेतली होती. 2019-20 ते 2023-24 दरम्यान निवडलेल्या सहा जिल्ह्यांपैकी चार[4] जिल्ह्यांत मंजुरी मिळालेल्या 28,583 फलोत्पादन कार्यक्रमांपैकी 15,009 (52 टक्के) कामे अपूर्ण होती. तसेच, या निवडलेल्या चार जिल्ह्यांत 2019-20 ते 2020-21 दरम्यान 12,218 मंजुरी मिळालेल्या कामांपैकी 4,098 कामे (34 टक्के) कार्यक्रम तीन वर्षांसाठी असून 2023-24 पर्यंत पूर्ण होणे आवश्यक होते तरी अपूर्ण होती.

उप जिल्हाधिकारी (रोजगार हमी योजना), अमरावती यांनी अपूर्ण कामांना तांत्रिक अडचण आणि अकुशल मजुरी व साहित्य घटकांची प्रलंबित देयके कारणीभूत असल्याचे नमूद केले (जून 2025), तर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, छत्रपती संभाजी नगर (ऑगस्ट 2024) आणि उप जिल्हाधिकारी (रोजगार हमी योजना), धाराशिव (जून 2025) यांनी साहित्य घटकांसाठीच्या प्रलंबित देयकामुळे काम अपूर्ण असल्याचे नमूद केले.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, अमरावती व छत्रपती संभाजी नगर आणि उप जिल्हाधिकारी (रोजगार हमी योजना) धाराशिव यांनी नमूद केले की (ऑगस्ट 2025

---

[3] लाभार्थी म्हणजे उपेक्षित व दुर्बल घटकांपैकी ग्रामीण कुटुंबे (अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती/ दारिद्ररेषेखालील/ दोन एकरहून कमी जमीन असलेले छोटे शेतकरी) ज्यांची स्वत:च्या मालकीची जमीन आहे आणि लागवड करून तीन ते पाच वर्षांच्या आवश्यक कालावधीसाठी देखरेख करण्यासाठी ते उत्सुक आहेत.

[4] पालघर आणि नागपूर या दोन जिल्ह्यांनी माहिती सादर केली नाही.

व जून 2025), ₹ 17.92 कोटी खर्च झालेली 3,474 कामे[5] बंद करण्यासाठी प्रस्तावित होती.

अश्या रितीने, चार जिल्ह्यांतील अपूर्ण कामांचा परिणाम म्हणजे लाभार्थ्यांचे आर्थिक उत्पन्न व राहणीमान उंचावण्यासाठी आवश्यक अशी टिकाऊ मालमत्ता निर्माण होऊ शकली नाही. याशिवाय, छत्रपती संभाजी नगर, धाराशिव आणि अमरावती जिल्ह्यातील बंद करण्यासाठी प्रस्तावित असलेल्या 3,474 अपूर्ण कामांवर झालेला ₹ 17.92 कोटींचा खर्च निष्फळ ठरणार आहे.

उत्तरादाखल आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी नमूद केले की (जून 2025), सध्या सुरू असलेली सर्व कामे प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी सर्व सहकार्यक्रम अधिकारी, कार्यक्रम तांत्रिक अधिकारी आणि इतर अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेण्यात येईल.

### 5.3.2 सुरू न झालेली कामे

**तक्ता 5.1** मध्ये दर्शविल्याप्रमाणे राज्यात 2019-20 ते 2023-24 दरम्यान मंजूर झालेली 7.10 लाख कामे (27.62 टक्के) सुरू झाली नाहीत (मार्च 2025 पर्यंत) त्यापैकी 2.48 लाख कामे (35 टक्के) तीन वर्षांहून अधिक काळ उलटून गेला तरी सुरू झालेली नाहीत. निवडलेल्या सहा जिल्ह्यांमध्ये (**तक्ता 5.2**) 2019-20 ते 2023-24 दरम्यान मंजूर झालेली 1.53 लाख कामे (27 टक्के) सुरू (मार्च 2025 पर्यंत) झाली नाहीत त्यापैकी 0.47 लाख कामे (30 टक्के) तीन वर्षांहून अधिक काळ संपल्यावरही सुरू झालेली नाहीत.

उत्तरादाखल उप जिल्हाधिकारी (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी नमूद केले की (ऑगस्ट 2024), अंमलबजावणीसाठी मंजूर झालेल्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात वैयक्तिक कामे आहेत जी लाभार्थ्यांच्या वैयक्तिक समस्यांमुळे वेळेवर सुरू झाली नाहीत.

## 5.4 नवीन कामांना मंजुरी

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम कार्यचालन मार्गदर्शक तत्त्वांच्या परिच्छेद 7.17 मध्ये अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी खालील उपाय सुचवले आहेत.

- ज्या वर्षी कामे प्रस्तावित होती, ते वर्ष पूर्ण झाल्यानंतर एकापेक्षा जास्त आर्थिक वर्षापासून अपूर्ण कामे आहेत, अशा प्रकल्प अंमलबजावणी अभिकरणांना नवीन कामे घेण्यास मंजूरी देऊ नये.
- ग्राम पंचायतींनी अपूर्ण असलेल्या कामांवर जिथे आवश्यक मजूर रोजगार निर्मितीची क्षमता आहे, अशा कामांचे वाटप प्रथम करावे.

[5] 30 टक्क्यांपेक्षा कमी खर्च झालेली कामे

- अपूर्ण कामे असताना कोणत्याही ग्राम पंचायतीला ठराविक वेळी किती कामे हाती घेता येतील याची मर्यादा घालण्याचे निर्देश जारी करावेत, असे आवाहनही राज्य शासनाला करण्यात आले.

ग्राम पंचायतीत ठराविक वेळेत किती कामे हाती घेता येतील, याची मर्यादा राज्य शासनाने निश्चित केलेली नसल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले. 2023-24 मध्ये मंजूर झालेल्या 7.56 लाख कामांपैकी 4.44 लाख नवीन कामे अंमलबजावणीसाठी हाती घेण्यात आली, जरी 2023-24 च्या प्रारंभी 5.04 लाख कामे अपूर्ण होती.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की चाचणी-तपासणी केलेल्या 48 ग्राम पंचायतीपैकी 15 ग्राम पंचायतीत 2023-24 च्या प्रारंभीच्या कालावधीत 542 कामे अपूर्ण होती तरी 2023-24 मध्ये मंजूरी मिळालेल्या 339 नवीन कामांना सुरुवात करण्यात आली होती. त्यामुळे कोणत्याही ग्रामपंचायतीत ठराविक वेळी किती कामे हाती घेता येतील, याची मर्यादा निश्चित करण्यात अपयश आल्याने निवडलेल्या ग्रामपंचायतींमध्ये हाती घेतलेल्या कामांपेक्षा अपूर्ण कामांची संख्या अधिक असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

उत्तरादाखल आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी कामे पूर्ण झाल्यानंतरच नवीन कामे हाती घेण्याच्या सूचना जिल्ह्यांना दिल्या जातील असे नमूद केले (जून 2025).

## 5.5 कृषी व अनुषंगिक कामांवर होणारा खर्च

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाच्या अनुसूची 1 च्या परिच्छेद 4 (जुलै 2014 मधील दुरुस्तीनुसार) च्या उप-परिच्छेद (2) मधील तरतुदीनुसार, जिल्हा कार्यक्रम समन्वयकाने हे सुनिश्चित करावे की, खर्चाच्या दृष्टीने जिल्ह्यात करावयाच्या कामांपैकी कमीतकमी 60 टक्के कामे जमिन, पाणी आणि झाडांच्या विकासाद्वारे कृषी आणि संलग्न उपक्रमांशी थेट संबंधित उत्पादक मालमत्ता तयार करण्यासाठी असतील. जुलै 2014 मध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमात करण्यात आलेल्या दुरुस्तीचा समावेश राज्य शासनाने महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम,1977 मध्ये केलेला नसल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले. त्यामुळे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम आणि महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, 1977 मध्ये त्या प्रमाणात विसंगती होती.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, 2019-20 ते 2023-24 दरम्यान सहा पैकी पाच[6] जिल्ह्यांमध्ये कृषी आणि संलग्न कामांशी संबंधित कामांचा खर्च 60 टक्क्यांपेक्षा कमी होता ज्याचा तपशील **परिशिष्ट 5.1** मध्ये दर्शविला आहे.

**परिशिष्ट 5.1** मध्ये दर्शविल्याप्रमाणे 2019-20 ते 2023-24 दरम्यान पालघर जिल्ह्यातील खर्च 17 ते 39 टक्क्यांदरम्यान होता.

[6] छत्रपती संभाजी नगर व्यतिरिक्त

उत्तरादाखल आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी मे 2025 मधील नागपूर जिल्ह्यात कृषी व संलग्न कामांची टक्केवारी 64.94 टक्के असून उर्वरित जिल्ह्यांमध्ये ही टक्केवारी कायम ठेवण्याचा प्रयत्न केला जाईल, असे नमूद केले (जून 2025)**.**

## 5.6 महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने सोबत योजनांचे अभिसरण

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमाच्या अनुसूची II च्या परिच्छेद 5 नुसार या योजनेतील कामांचे इतर शासकीय योजना किंवा कार्यक्रमांशी प्रभावी आंतरविभागीय अभिसरण प्रक्रियेद्वारे समन्वयन करून कामांची अंतिम टप्प्यापर्यंत अंमलबजावणी साध्य करण्यासाठी राज्य शासन ठोस पावले उचलेल जेणेकरून मालमत्तेची गुणवत्ता आणि उत्पादकता सुधारेल आणि दारिद्र्याच्या अनेक परिमाणांना सर्वांगीण आणि शाश्वत पद्धतीने सामोरे जाण्यासाठी समन्वय साधला जाईल.

कार्यचालन मार्गदर्शक तत्वे (**परिच्छेद 15.1.1**) नुसार टिकाऊ मालमत्तेच्या निर्मितीसाठी या योजनेच्या निधीचे, इतर योजनांच्या निधी व स्त्रोतांसोबत अभिसरण करण्यास अनुमती आहे. अभिसरण अंतर्गत अंगणवाडी/ इतर ग्रामीण पायाभूत सुविधांची उभारणी, वैयक्तिक जमिनीवरील कामे (आवास योजना), दुष्काळ रोधक उपाययोजना, ग्रामीण दळणवळण व ग्रामीण स्वच्छता, जलसंधारण व जलबांधणी, पारंपारिक जलस्त्रोतांचे नूतनीकरण व दुरूस्ती आदी कामे करण्यात आली

जे प्रकल्प अभिसरण योजना म्हणून निश्चित केले जातात त्यावर ग्राम सभेत चर्चा केली जाते. राज्यात राज्यस्तरीय अभिसरण समिती, जिल्हास्तरीय अभिसरण समिती आणि तालुकास्तरीय अभिसरण समिती[7] स्थापित करण्यात आली आहे. तालुकास्तरीय अभिसरण समिती तालुका अभिसरण योजना तयार करते आणि त्याच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी समिती जबाबदार असते. जिल्हास्तरीय अभिसरण समिती[8] अभिसरण कामांसाठी विविध विभागांच्या समन्वयासाठी जबाबदार असते, जिल्हा अभिसरण योजना तयार करते आणि कामांच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करते.

2019-20 ते 2023-24 दरम्यान राज्यात हाती घेण्यात आलेल्या अभिसरण प्रकल्पांची संख्या **तक्ता 5.3** मध्ये दर्शविण्यात आली आहे**.**

---

[7] तहसिलदार या समितीचे अध्यक्ष असतात आणि गट विकास अधिकारी उपाध्यक्ष असतात.

[8] जिल्हाधिकारी या समितीचे अध्यक्ष असतात आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपाध्यक्ष असतात.

**तक्ता 5.3: अभिसरण अंतर्गत हाती घेतलेले प्रकल्प**

| वर्ष | अभिसरण अंतर्गत मंजूर प्रकल्प[9] | पूर्ण झालेली अभिसरण कामे | पूर्ण झालेल्या अभिसरण कामांची टक्केवारी |
|---|---|---|---|
| 2019-20 | 3,26,073 | 1,02,000 | 31 |
| 2020-21 | 2,39,399 | 62,590 | 26 |
| 2021-22 | 1,88,935 | 52,175 | 28 |
| 2022-23 | 2,71,700 | 59,175 | 22 |
| 2023-24 | 4,97,772 | 35,329 | 7 |
| **एकूण** | **15,23,879** | **3,11,269** | **20** |
| ***स्त्रोत: नरेगासॉफ्टमधून घेतलेल्या (सप्टेंबर 2025) विदाच्या आधारे संकलित.*** | | | |

**तक्ता 5.3** मध्ये दर्शविल्याप्रमाणे 2019-20 ते 2023-24 दरम्यान केवळ 20 टक्के अभिसरणाचे काम पूर्ण झाले आहे.

2019-20 ते 2023-24 या कालावधीत मंजूर झालेल्या एकूण 15.24 लाख अभिसरण कामांपैकी 14.97 लाख (98.23 टक्के) कामे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत **तक्ता 5.4** मध्ये दर्शविल्याप्रमाणे होती.

**तक्ता 5.4: अभिसरण अंतर्गत मंजूर झालेल्या एकूण प्रकल्पांच्या तुलनेत अभिसरण अंतर्गत मंजूर प्रधानमंत्री आवास योजना प्रकल्प**

| वर्ष | अभिसरण अंतर्गत मंजूर प्रकल्प | अभिसरण अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना प्रकल्प कामांना मंजुरी | एकूण अभिसरण प्रकल्पांमध्ये प्रधानमंत्री आवास योजना प्रकल्पाच्या कामांची टक्केवारी | प्रधानमंत्री आवास योजना प्रकल्पाची एकूण पूर्ण कामे (टक्के) | अभिसरण अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेतर प्रकल्प कामांना मंजुरी | प्रधानमंत्री आवास योजनेतर प्रकल्पाची एकूण पूर्ण कामे (टक्के) |
|---|---|---|---|---|---|---|
| 2019-20 | 3,26,073 | 3,25,140 | 99.71 | 1,01,547(31) | 933 | 453(49) |
| 2020-21 | 2,39,399 | 2,38,339 | 99.56 | 62,048(26) | 1,060 | 542(51) |
| 2021-22 | 1,88,935 | 1,87,473 | 99.23 | 51,597(28) | 1,462 | 578(40) |
| 2022-23 | 2,71,700 | 2,59,878 | 95.65 | 58,000(22) | 11,822 | 1,175(10) |
| 2023-24 | 4,97,772 | 4,86,001 | 97.64 | 34,771(7) | 11,771 | 558(5) |
| **एकूण** | **15,23,879** | **14,96,831** | **98.23** | **3,07,963 (21)** | **27,388** | **3,306 (12)** |
| ***स्त्रोत: नरेगासॉफ्टवेयर मधून घेतलेल्या (सप्टेंबर 2025) विदाच्या आधारे संकलित.*** | | | | | | |

**तक्ता 5.4** मध्ये दर्शविल्याप्रमाणे, 2019-20 ते 2023-24 दरम्यान एकूण अभिसरण प्रकल्प कामांपैकी प्रधानमंत्री आवास योजना अभिसरण प्रकल्प कामांचे प्रमाण 95.65 टक्के (2022-23) ते 99.71 टक्के (2019-20) दरम्यान होते. प्रधानमंत्री आवास योजना कामे मंजूर कामांच्या तुलनेत सात टक्के (2023-24) आणि 31 टक्के (2019-20) दरम्यान पूर्ण झाली तर प्रधान मंत्री आवास योजनेतर कामे पाच टक्के (2023-24) आणि 51 टक्के (2020-21) दरम्यान पूर्ण झाली.

[9] आयुक्त, (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी अभिसरणांतर्गत दर्शविलेले मंजूर प्रकल्प आणि 2019-20 ते 2023-24 दरम्यान मंजूर झालेली एकूण कामे यांच्यातील तफावतीचा ताळमेळ घेतला नाही.

### *5.6.1 प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत 90 पेक्षा जास्त मनुष्यदिवसांचा वापर*

महाराष्ट शासनाच्या नियोजन विभागाने (रोजगार हमी योजना) मे 2015 मध्ये जारी केलेल्या शासन निर्णयाद्वारे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरांच्या बांधकामातील अकुशल काम महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अनुषंगाने घेण्याचे निर्देश दिले होते. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत बांधकामासाठी सामान्य भागात जास्तीत जास्त 90 मनुष्यदिवस आणि डोंगराळ भागात 95 मनुष्यदिवस काम केले जावे, अशी अट घालण्यात आली होती.

नरेगासॉफ्टनुसार राज्यात 2019-20 आणि 2023-24 दरम्यान प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत हाती घेण्यात आलेल्या अभिसरण कामांच्या विदाचे विश्लेषण केल्यावर असे निदर्शनास आले आहे की, 1,179 कामांमध्ये (31 जिल्ह्यांतील) प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत अकुशल कामगारांना नियुक्त केलेल्या दिवसांची संख्या 91 दिवस ते 152 दिवस यांच्या दरम्यान होती जे शासकीय निर्णयाचे उल्लंघन होते. त्यामुळे मनुष्यदिवस मर्यादेपेक्षा जास्त होवू नयेत, यासाठी जिल्ह्यांकडून कोणतेही संनियंत्रण करण्यात आले नाही, तसेच शासन निर्णयात नमूद केलेल्या मनुष्यदिवसांपेक्षा अधिक मनुष्यदिवसांचा वापर रोखण्यासाठी नरेगासॉफ्टमध्ये कोणतेही नियंत्रण नव्हते.

उत्तरादाखल आयुक्त, (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी अनियमितता मान्य करताना नमूद केले की (जून 2025), प्रधानमंत्री आवास योजना अभिसरण कामांतर्गत विहित मनुष्यदिवस मर्यादेचे पालन करण्याच्या सक्त सूचना सर्व अंमलबजावणी अभिकरणांना देण्यात आलेल्या आहेत. मात्र, या मर्यादेचे पालन व्हावे, यासाठी नरेगासॉफ्टमधील तपासणीच्या उत्तराबाबत मौन बाळगण्यात आले.

## 5.7 मजुरी साहित्य गुणोत्तर

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, 2005 च्या अनुसूची I च्या परिच्छेद 20 नुसार (जुलै 2014 मधील दुरुस्तीनुसार) ग्राम पंचायत व इतर अंमलबजावणी यंत्रणांनी योजनेंतर्गत हाती घेतलेल्या सर्व कामांसाठी कुशल व निम-कुशल कामगारांच्या मजुरीसह साहित्य घटकांची किंमत जिल्हास्तरावर 40 टक्क्यांपेक्षा जास्त नसावी. तथापि, महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमानुसार ग्राम पंचायत आणि ग्राम पंचायतेतर इतर अंमलबजावणी अभिकरणांनी हाती घेतलेल्या सर्व कामांसाठी कुशल आणि निम-कुशल कामगारांच्या मजुरीसह साधन-सामग्री घटकांची किंमत अनुक्रमे ग्राम पंचायत स्तरावर आणि तालुका स्तरावर 40 टक्क्यांपेक्षा जास्त असू नये.

तसेच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाप्रमाणे कार्यचालन मार्गदर्शक तत्वांच्या परिच्छेद 7.5 नुसार या गुणोत्तराचे उल्लंघन केल्यास होणारा खर्च नामंजूर केला जाईल आणि हा खर्च राज्य शासनाचे दायित्व असेल.

2019-20 ते 2023-24 दरम्यान निवडलेल्या सहा जिल्ह्यांपैकी तीन जिल्ह्यांनी **तक्ता 5.5** मध्ये दर्शविल्याप्रमाणे विहित मजुरी-साहित्य गुणोत्तर राखले नसल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले.

**तक्ता 5.5: निवडलेल्या जिल्ह्यांमध्ये विहित मजुरी-साहित्य गुणोत्तर न राखणे**

| वर्ष | जिल्हा | मजुरीवरील प्रत्यक्ष खर्च (टक्के) | साहित्यावरील प्रत्यक्ष खर्च (टक्के) | एकूण खर्च | साहित्यावरील विहित खर्च (एकूण खर्चाच्या 40 टक्के) | साहित्यावरील जादा खर्चामुळे राज्यावर येणारे दायित्व (कोटीत) |
|---|---|---|---|---|---|---|
| (₹ कोटीत) | | | | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7=4-6 |
| **2019-20** | धाराशिव | 24.80 *(54.46)* | 20.74 (45.54) | 45.54 | 18.22 | 2.52 |
| **2023-24** | अमरावती | 272.15 *(56.62)* | 208.53 *(43.38)* | 480.68 | 192.27 | 16.26 |
| | नागपूर | 48.38 *(53.17)* | 42.62 *(46.83)* | 91.00 | 36.40 | 6.22 |
| | **एकूण** | **345.33 *(55.95)*** | **271.89 *(44.05)*** | **617.22** | **246.89** | **25.00** |
| *स्त्रोत: नरेगासॉफ्टमधून घेतलेल्या (जानेवारी 2025) विदाच्या आधारे संकलित* | | | | | | |

**तक्ता 5.5** मध्ये दर्शविल्याप्रमाणे जिल्हास्तरावर विहित मजुरी साहित्याचे प्रमाण राखले जात नसल्यामुळे राज्य शासनावर ₹ 25 कोटींचे दायित्व आले.

उत्तरादाखल आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी नमूद केले की (जून 2025), सर्व जिल्ह्यांना मजुरी साहित्य गुणोत्तर राखण्याच्या सूचना देण्यात आल्या असून हे प्रमाण राखण्याची सुनिश्चिती करण्यात येईल.

2019-20 ते 2023-24 दरम्यान निवडलेल्या तालुक्यांमधील[10] मजुरी साहित्याच्या गुणोत्तराचे लेखापरीक्षणाने विश्लेषण केले. विश्लेषणात **तक्ता 5.6** मध्ये दर्शविल्याप्रमाणे साहित्यावर अतिरिक्त खर्च निदर्शनास आला.

[10] नरेगासॉफ्टमध्ये ग्राम पंचायत स्तरावरील माहिती उपलब्ध नव्हती.

**तक्ता 5.6: निवडलेल्या तालुक्यांमध्ये विहित मजुरी साहित्य गुणोत्तर न राखणे**

| वर्ष | जिल्ह्याचे नाव | तालुक्याचे नाव | मजुरांवरील प्रत्यक्ष खर्च (टक्केवारी) | साहित्यावरील प्रत्यक्ष खर्च (टक्के) | एकूण खर्च | साहित्यावरील विहित खर्च (एकूण खर्चाच्या 40 टक्के) | साहित्यावर अतिरिक्त खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | (₹ लाखात) | | | | |
| 1 | | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 2019-20 | धाराशिव | | 646.16 (54.80) | 533.01 (45.20) | 1,179.17 | 471.67 | 61.34 |
| 2021-22 | | कळंब | 776.44 (50.58) | 758.66 (49.42) | 1,535.1 | 614.04 | 144.62 |
| 2023-24 | | | 1,731.51 (49.84) | 1,742.93 (50.16) | 3,474.44 | 1,389.78 | 353.15 |
| 2019-20 | | उस्मानाबाद | 209.74 (59.50) | 142.75 (40.50) | 352.49 | 141.00 | 1.75 |
| 2021-22 | अहिल्यानगर | जामखेड | 520.15 (47.95) | 564.64 (52.05) | 1,084.79 | 433.92 | 130.72 |
| 2022-23 | | शेवगाव | 364.88 (55.51) | 292.39 (44.49) | 657.27 | 262.91 | 29.48 |
| 2020-21 | छत्रपती संभाजीनगर | | 243.23 (53.71) | 209.67 (46.29) | 452.9 | 181.16 | 28.51 |
| 2022-23 | | औरंगाबाद | 673.06 (41.20) | 960.71 (58.80) | 1,633.77 | 653.51 | 307.20 |
| 2023-24 | | | 2,698.12 (57.23) | 2,016.16 (42.77) | 4,714.28 | 1,885.71 | 130.89 |
| 2022-23 | | पैठण | 2,372.23 (48.91) | 2,478.04 (51.09) | 4,850.27 | 1,940.11 | 537.93 |
| 2023-24 | | | 4,902.73 (52.81) | 4,381.40 (47.19) | 9,284.13 | 3,713.65 | 667.75 |
| 2021-22 | पालघर | डहाणू | 432.50 (58.60) | 305.56 (41.40) | 738.06 | 295.22 | 10.34 |
| 2022-23 | | विक्रमगड | 5,431.71 (57.94) | 3,942.78 (42.06) | 9,374.49 | 3,749.80 | 192.98 |
| | **एकूण** | | | | | | **2,596.24** |

*स्त्रोत: नरेगासॉफ्टवरून घेतलेल्या (सप्टेंबर 2025) विदावर आधारित संकलित*

**तक्ता 5.6** मध्ये दर्शविल्याप्रमाणे, निवडलेल्या 12 पैकी आठ तालुक्यांनी विहित मजुरी -साहित्य गुणोत्तर राखले नाही परिणामी, साहित्यावर ₹ 25.96 कोटी अतिरिक्त खर्च झाला.

## 5.8 जिल्हास्तरीय तांत्रिक समिती

कार्यचालन मार्गदर्शक तत्वांच्या परिच्छेद 4.4.3 मध्ये अधिनियमाच्या अंमलबजावणीकरीता मार्गदर्शन करण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हास्तरीय तांत्रिक समिती स्थापन करण्याची तरतूद आहे. जिल्हास्तरीय तांत्रिक समितीमध्ये संबंधित तांत्रिक विभागाचे जिल्हा अधिकारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी आणि शैक्षणिक समुदायाचा समावेश असणे आवश्यक आहे. या समितीच्या कामांमध्ये प्रकल्पांच्या सूचीची तपासणी करणे, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सर्वसामान्य कामांसाठी दरांचे जिल्हानिहाय विशिष्ट दरपत्रक तयार करणे, साहित्यासाठी जिल्ह्याचे दर, गुणवत्तेचे निकष आणि त्या जिल्हयाकरीता साधनसामग्रीसाठी पुरवठादारांची यादी निश्चित करणे आणि योजनेंतर्गत तयार करण्यात येणाऱ्या मालमत्तेची गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी निकष निश्चित करणे यांचा समावेश होता.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की निवडलेल्या जिल्ह्यांत जिल्हास्तरीय तांत्रिक समिती स्थापन करण्यात आली नव्हती.

जिल्हास्तरीय तांत्रिक समिती नसल्यामुळे या योजनेतील सर्वसामान्य कामांसाठी जिल्हाविशिष्ट दरपत्रकाऐवजी सर्वसामान्य राज्य दरपत्रकाच्या आधारे कामांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले जे परिच्छेद 4.9.1 मध्ये चर्चिले आहे.

## 5.9 कार्यस्थळी देण्यात येणाऱ्या सुविधा

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमाच्या अनुसूची III च्या परिच्छेद 23 नुसार कामगारांना किमान हक्क म्हणून कामाच्या ठिकाणी पिण्याचे शुद्ध पाणी, मुलांसाठी व विश्रांतीच्या कालावधीसाठी सुरक्षित शेड, किरकोळ जखमा व इतर आरोग्यविषयक व कामावरील आरोग्याशी धोक्यासंबंधी आपत्कालीन उपचारासाठी पुरेसे साहित्य असलेली प्रथमोपचार पेटी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. कोणत्याही ठिकाणी काम करणाऱ्या महिलेसोबत असलेल्या पाच वर्षांखालील मुलांची संख्या पाच किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास अशा मुलांच्या देखभालीसाठी अशा महिला कामगारांपैकी एकाची नेमणूक करण्याची तरतूद करता येईल. अशा प्रकारे नियुक्त केलेल्या व्यक्तीला वेतन दिले जाईल. कार्यस्थळावरील सुविधांवरील सर्व खर्च प्रशासकीय खर्चाचा भाग म्हणून नोंद करायचा होता.

निवडलेल्या 48 ग्रामपंचायतींमधील निवडलेल्या 480 लाभार्थ्यांच्या सर्वेक्षणात खालील बाबी निदर्शनास आल्या.

- 119 लाभार्थ्यांनी (25 टक्के) कामाच्या ठिकाणी प्रथमोपचार पेटी उपलब्ध नसल्याचे नमूद केले;

- 54 लाभार्थ्यांनी (11 टक्के) पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध नसल्याचे नमूद केले;
- 91 लाभार्थ्यांनी (19 टक्के) विश्रांतीसाठी आच्छादित जागा/शेड उपलब्ध नसल्याचे नमूद केले आणि
- 182 लाभार्थ्यांनी (38 टक्के) कामाच्या ठिकाणी बालसंगोपनाची सुविधा उपलब्ध नसल्याचे नमूद केले.

कामाच्या ठिकाणी किमान मूलभूत सुविधा उपलब्ध नसणे हे महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमाचे उल्लंघन तर होतेच, शिवाय रोजगार करू इच्छिणाऱ्यांसाठी कार्यस्थळाचे वातावरण अधिक खडतर बनले आणि त्यामुळे त्यांच्या कार्यक्षमतेवर आणि परिणामी मिळणाऱ्या मजुरीवर नकारात्मक परिणाम झाला.

उत्तरादाखल आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी नमूद केले की (जून 2025), सर्व अंमलबजावणी यंत्रणांना सर्व कार्यस्थळी प्रथमोपचार पेटी, पिण्याचे पाणी, आच्छादित जागा/शेड आणि बालसंगोपन सुविधा तत्काळ उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या सुविधांच्या उपलब्धतेची पडताळणी करण्यासाठी वेळोवेळी क्षेत्रीय पाहणी केली जाईल, असेही नमूद करण्यात आले.

## 5.10 दर्शक फलक

योजनेच्या परिच्छेद 24 (अ) नुसार (महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियामाची अनुसूची II) अंमलबजावणीच्या सर्व टप्प्यांवर पारदर्शकता व उत्तरदायित्व सुनिश्चित करण्यासाठी प्रत्येक कामाच्या ठिकाणी कामाचा तपशील, वापरण्यात येणाऱ्या साहित्याचे प्रमाण, अंदाजपत्रकाचा वस्तुनिहाय खर्च यांचा समावेश असलेला नागरिकांसाठीचा दर्शक फलक लावणे आवश्यक आहे.

336 कामांची प्रत्यक्ष पडताळणी केली असता **तक्ता 5.7** मध्ये दर्शविल्याप्रमाणे 219 कार्यस्थळी (65 टक्के) दर्शक फलक उपलब्ध नसल्याचे लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आले.

**तक्ता 5.7: कार्यस्थळी दर्शक फलकाची अनुपलब्धता**


| अनु. क्र. | जिल्ह्याचे नाव | एकूण निवडलेली कामे | ज्या कामांच्या ठिकाणी दर्शक फलक उपलब्ध नव्हते |
|---|---|---|---|
| 1 | अहिल्यानगर | 56 | 34 |
| 2 | अमरावती | 56 | 48 |
| 3 | छत्रपती संभाजीनगर | 56 | 19 |
| 4 | धाराशिव | 56 | 56 |
| 5 | नागपूर | 56 | 30 |
| 6 | पालघर | 56 | 32 |
| | **एकूण** | **336** | **219** |
| *स्त्रोत: लेखापरीक्षणाद्वारे केलेल्या संयुक्त प्रत्यक्ष पडताळणीच्या आधारे संकलित* | | | |

उत्तरादाखल आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी कामाचा तपशील असलेला दर्शक फलक लावण्याच्या सूचना जारी करत असल्याचे नमूद केले (जून 2025).

## 5.11 संयुक्त प्रत्यक्ष पडताळणी

लेखापरीक्षण दलाने निवडलेल्या 336 कामांची संयुक्त प्रत्यक्ष पडताळणी केली आणि निदर्शनास आलेल्या त्रुटींची चर्चा पुढील परिच्छेदांमध्ये केली आहे.

### 5.11.1 रस्त्यांची कामे

<table>
<tr><td colspan="2">(i) जिल्हा : पालघर; तालुका : डहाणू; ग्राम पंचायत .: वेती वरोटी<br>कामाची स्थिती : पूर्ण; झालेला खर्च : ₹ 3.97 लाख;<br>काम सुरू करण्यात आले ते वर्ष : 2021-22; काम पूर्ण झाले ते वर्ष : 2021-22.</td></tr>
<tr><td>या कामात 410 मीटर खडीच्या रस्त्याचे बांधकाम करण्यात आले. हा रस्ता सूर्या नदीला लागून असून प्रत्यक्ष पडताळणी केली असता सुमारे 100 मीटर रस्ता पाण्याखाली गेल्याचे आढळून आले. त्यामुळे या रस्त्याने गावाला सर्व ऋतूंमध्ये संपर्क करणे अशक्य होते.</td><td>
</td></tr>
<tr><td colspan="2">ii) जिल्हा : पालघर; तालुका : विक्रमगड; ग्राम पंचायत : बोरांडा<br>कामाची स्थिती : चालू, झालेला खर्च : ₹ 8.78 लाख;<br>काम सुरू केले ते वर्ष : 2022-23.</td></tr>
<tr><td>पांढरेपाडा ते रायगुंजपाडा या सध्याच्या रस्त्याची रुंदी रस्त्याच्या कडेला असलेल्या मालाचा निचरा झाल्यामुळे कमी झाली होती. त्यामुळे हा रस्ता राज्य परिवहनच्या बसेस इत्यादींसाठी सुलभ व्हावा यासाठी रस्ता सुधारणेचे काम हाती घेण्यात आले.<br>रस्त्याच्या दोन्ही कडेला करण्यात आलेल्या खांदा बांधणीचे काम (मे 2022 ते एप्रिल 2023 दरम्यान) प्रत्यक्ष पडताळणी दरम्यान दिसून आले नाही. उत्तरादाखल ग्राम पंचायतीने रस्त्याचा खांदा बांधणीचा बहुतांश भाग गवताने झाकला गेला आहे आणि मुसळधार पावसामुळे काही भागाचे नुकसान झाले आहे, असे नमूद केले.</td><td>
</td></tr>
</table>

<table>
<tr><td>त्यामुळे टिकाऊ स्वरूपाची खांदाबांधणी पुरविण्याचे उद्दिष्ट एक वर्षाहून अधिक काळ लोटल्यानंतरही साध्य होऊ शकले नाही.</td><td></td></tr>
<tr><td colspan="2">iii) जिल्हा : पालघर; तालुका : विक्रमगड; ग्राम पंचायत : बोरांडा<br>कामाची स्थिती : चालू (प्रत्यक्ष पूर्ण); झालेला खर्च : ₹ 7.82 लाख;<br>काम सुरू केले ते वर्ष : 2023-24.</td></tr>
<tr><td>2023-24 मध्ये 320 मीटर लांबीच्या पाणीबध्द खडी रस्त्याचे (मुख्य रस्ता ते लेलेपाडा) बांधकाम पूर्ण झाले. 65 मीटर लांबीच्या या रस्त्यापैकी पावसामुळे 12 मीटर लांबीचा रस्ता वाहून गेला.<br>त्यामुळे या रस्त्याला सर्व ऋतुत संपर्कासाठी वापर राहिला नाही.</td><td></td></tr>
<tr><td colspan="2">iv) जिल्हा : पालघर; तालुका : डहाणू ; ग्राम पंचायत : चळणी<br>कामाची स्थिती : चालू ; झालेला खर्च : ₹ 1.49 लाख (मंजूर खर्च: ₹ 6.40 लाख);<br>काम सुरू केले ते वर्ष : 2021-22.</td></tr>
<tr><td>417 मीटर लांबीच्या खडीच्या रस्त्याचे बांधकाम केवळ मुरूम टाकून करण्यात आले. दाब देवून मजबूतीकरण आणि खडी टाकण्याचे काम बाकी होते. प्रत्यक्ष पडताळणी केली असता पावसामुळे संपूर्ण 417 मीटर रस्ता खराब झाल्याचे निदर्शनास आले.<br>त्यामुळे या रस्त्याचे काम सुरू होऊन दोन वर्षे झाली तरी या रस्त्यामुळे गावाला सर्व ऋतुत संपर्क मिळाला नाही.</td><td></td></tr>
</table>

उत्तरादाखल आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी नमूद केले की (जून 2025), जिल्ह्यांना स्पष्टीकरण सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

## 5.11.2 रेशीम शेतीचे काम

**जिल्हा : धाराशिव; तालुका : कळंब; ग्राम पंचायत : शेळका (धानोरा)**
**कामाची स्थिती : अर्धवट सोडून दिलेले; झालेला खर्च : ₹ 2.35 लाख;**
**काम सुरू केले ते वर्ष: 2022-23.**

2022-23 मध्ये रेशीम पालनाच्या कामाला मंजुरी देण्यात आली. शेतकऱ्याचे उत्पन्न वाढविणे हा या कामाचा उद्देश होता. लाभार्थ्यांनी तुती रोपांची लागवड करून रेशीम किड्यांचे पालन करून त्यापासून रेशीम मिळविण्यासाठी लागवडीकरीता आपल्या शेतात शेड बांधले. लेखापरीक्षण पथकाने संयुक्त प्रत्यक्ष पडताळणी केली असता, या जागेवर रेशीम किडे उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आणि शिवाय, रेशीम किडे ज्या स्टँडवर ठेवायचे होते, ते शेडखाली उपलब्ध असलेले स्टँड खराब झाले असून वापरण्यायोग्य स्थितीत नव्हते.

त्यामुळे लाभार्थ्याला उत्पन्नाचा स्तर वाढविण्यासाठी मदत करण्याकरीता कोणतीही टिकाऊ मालमत्ता उपलब्ध होत नव्हती.

उत्तरादाखल ग्राम पंचायतीच्या ग्रामसेवकाने नमूद केले की (ऑगस्ट 2024), लाभार्थ्याने शेड स्वच्छ करून रेशीम किड्याची लागवड केली जाईल असे आश्वासन दिले







## 5.11.3 विहिरीचे बांधकाम

**i) जिल्हा : छत्रपती संभाजी नगर. तालुका : पैठण; ग्राम पंचायत : घारेगाव**
**कामाची स्थिती : पूर्ण ; झालेला खर्च : ₹ 2.92 लाख;**
**काम सुरू केले ते वर्ष : 2021-22; काम पूर्ण झाले ते वर्ष : 2022-23**

लेखापरीक्षणात केलेल्या संयुक्त प्रत्यक्ष पडताळणी दरम्यान सिंचन विहिरीची कुंपण भिंत (गट क्रमांक 44) कोसळल्याचे निदर्शनास आले.

सिंचन विहिरीचे काम पूर्ण झाल्यापासून एक वर्ष तीन महिन्यांच्या आत कुंपण भिंत कोसळणे हे निकृष्ट दर्जाचे बांधकाम झाल्याचे दर्शविते. कुंपण भिंत नसल्यामुळे मनुष्य आणि प्राण्यांचा जीवही धोक्यात येऊ शकतो.



| **ii) जिल्हा : छत्रपती संभाजी नगर. तालुका : औरंगाबाद, ग्राम पंचायत : पिंपळ खुटा**<br>**कामाची स्थिती : चालू; खर्च : ₹ 1.87 लाख (मजुरीवर);**<br>**काम सुरू केले ते वर्ष : 2021-22.** | |
|---|---|
| काम सुरू होऊन तीन वर्षांहून अधिक कालावधी लोटला तरी विहिरीची कुंपण भिंत (श्री. ज्ञानेश्वर विश्वभर दाभाडे) बांधण्यात आली नसल्याचे संयुक्त पडताळणीत निदर्शनास आले.<br>ग्रामसेवकाने लाभार्थ्याची आर्थिक परिस्थिति बेताची आहे, हे अपूर्ण कामाचे कारण नमूद केले. |  |

## 5.11.4 मातोश्री पाणंद रस्ता योजना

सध्या अस्तित्वात असलेल्या कच्च्या पाणंद रस्त्यांची दुरुस्ती करणे, अशा रस्त्यांवरील अतिक्रमण हटविणे व कच्चे व पक्के रस्ते संयुक्तपणे बनविणे यासह या योजनेंतर्गत रस्त्यांची कामे शेतकऱ्यांना करता यावीत, यासाठी नियोजन विभागाने (रोजगार हमी योजना) ही योजना सुरू केली होती (नोव्हेंबर 2021). मातोश्री पाणंद रस्ते योजनेंतर्गत एक किलोमीटर खडबडीत रस्त्याच्या बांधकामासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत ₹ 15.05 लाखाचे (अकुशल : ₹ 9.03 लाख; कुशल ₹ 6.01 लाख) आणि राज्य रोजगार हमी योजना निधीतून ₹ 8.80 लाखाचे आर्थिक सहाय्य केले होते.

| **जिल्हा : छत्रपती संभाजी नगर. तालुका : औरंगाबाद, ग्राम पंचायत: पिंपळ खुटा**<br>**कामाची स्थिती : अपूर्ण; झालेला खर्च : मजुरी वर ₹ 4.83 लाख**<br>**काम सुरू केले ते वर्ष : 2023-24.** | |
|---|---|
| ग्राम पंचायत पिंपळखुटा येथील मातोश्री रस्त्याच्या बांधकामासाठी ₹ 23.69 लाख (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत ₹ 15.05 लाख आणि राज्य रोजगार हमी योजना निधीतून ₹ 15.05 लाख) मंजूर झाले. हे बांधकाम गवताचे तण काढणे, मातीचे खोदकाम करणे, कडक मुरूम पुरविणे व टाकणे आदी कामे करून करण्यात आले.<br>प्रत्यक्ष पडताळणी केली असता शेतात सर्वत्र गवत उगवले असून गवताचे तण काढणे, मातीचे खोदकाम करणे हे पुनश्च करावे लागेल.<br>उत्तरादाखल ग्राम पंचायतीच्या ग्रामसेवकाने साहित्य खरेदीसाठी अपुऱ्या निधीमुळे काम अपूर्ण असल्याचे नमूद केले (ऑगस्ट 2024). |  |

**परिच्छेद 6.5** मध्ये चर्चा केल्याप्रमाणे निदर्शनास आलेल्या त्रुटींसाठी प्रत्येक जिल्हयासाठी राज्य गुणवत्ता संनियंत्रकाची जिल्हास्तरावर नेमणूक न करणे हे कारणीभूत ठरले.

उत्तरादाखल आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी नमूद केले की (जून 2025), निधीअभावी काम अपूर्ण असून केंद्र शासनाकडून निधी मिळाल्यानंतर अपूर्ण काम पूर्ण करण्यासाठी संबंधित ग्राम पंचायतींना निधी उपलब्ध करून दिला जाईल.

## 5.12 कामांचे भौगोलिक चिन्हांकन (जिओ-टॅगिंग)

पारदर्शकता सुधारण्याच्या आणि कार्यक्रम अधिक सुस्पष्ट होण्याच्या उद्देशाने, ग्रामीण विकास मंत्रालयाने भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या (इस्रो) राष्ट्रीय दूरस्थ संवेदन केंद्राच्या भागीदारीत योजनेअंतर्गत तयार केलेल्या मालमत्तेचे भौगोलिक चिन्हांकन करण्यासाठी जिओ-मनरेगा म्हणजे कामांचे भौगोलिक चिन्हांकन याची महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत अंमलबजावणी सुरू केली. त्यासाठी राष्ट्रीय दूरस्थ संवेदन केंद्राचे भुवन जिओपोर्टल सानुकूलित करण्यात आले आहे.

भुवन मोबाइल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून अँड्रॉइड-आधारित मोबाइल ॲपचा वापर करून, क्षेत्रीय स्तरावरील विदा विश्लेषण, मालमत्तेचे दृश्यांकन आणि अहवाल निर्मिती साधने वापरून भौगोलिक ओळख ठरविली जाते. यामध्ये छायाचित्रांसह मालमत्तेचे - जागतिक स्थाननिश्चिती प्रणालीद्वारे स्थान नोंदवणे समाविष्ट आहे. 01 नोव्हेंबर 2017 नंतर निर्माण झालेल्या सर्व मालमत्तांचे (प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घेतलेली कामे वगळता) जिओ-मनरेगा टप्पा-II अंतर्गत, चिन्हांकन (जिओ टॅगिंग) खालीलप्रमाणे तीन टप्प्यांमध्ये करणे आवश्यक होते:

- टप्पा I भौगोलिक चिन्हांकन (काम सुरू होण्यापूर्वी): ज्या कामांना तांत्रिक व प्रशासकीय मान्यता मिळाली आहे आणि ज्यांचा सविस्तर प्रकल्प अहवाल नरेगासॉफ्ट मध्ये अंतिम (फ्रोझन) केला आहे, अश्या कामांवर ही प्रक्रिया करावी लागते.
- टप्पा II भौगोलिक चिन्हांकन (कामादरम्यान): एकदा कामाच्या अंदाजित खर्चाच्या 30 टक्के रक्कम खर्च म्हणून नोंदविल्यावर संबंधित काम टप्पा II भौगोलिक चिन्हांकनांसाठी (जिओ-टॅगिंग) उपलब्ध होईल.
- टप्पा III भौगोलिक चिन्हांकन (काम पूर्ण झाल्यानंतर): एकदा काम पूर्ण होऊन नरेगासॉफ्टमध्ये बंद झाल्यानंतर ते टप्पा III भौगोलिक चिन्हांकनासाठी उपलब्ध होते.

निवडलेल्या 12 तालुक्यांमधील तीन टप्प्यांमध्ये भौगोलिक चिन्हांकनाची स्थिती **तक्ता 5.8** मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता 5.8: निवडलेल्या 12 तालुक्यांमधील कामांच्या भौगोलिक चिन्हांकनाची स्थिती**

| तपशील | टप्पा I | टप्पा II | टप्पा III | एकूण (टक्केवारी) |
|---|---|---|---|---|
| कामांची संख्या | 89,859 | 65,097 | 20,305 | 1,75,261 |
| भौगोलिक चिन्हांकन पूर्ण झालेल्या कामांची संख्या | 75,838 | 33,331 | 13,710 | 1,22,879 *(70)* |
| राष्ट्रीय दूरस्थ संवेदन केंद्राच्या भुवन जिओपोर्टलवर सामायिक केलेल्या परंतु भौगोलिक चिन्हांकन न झालेल्या कामांची संख्या | 11,631 | 12,275 | 6,595 | 30,501 *(17)* |
| भौगोलिक चिन्हांकनासाठी सामायिक न केलेल्या कामांची संख्या | 2,390 | 19,491 | - | 21,881 *(13)* |
| *स्त्रोत: नरेगासॉफ्टमधून घेतलेल्या (ऑगस्ट 2024) विदाच्या आधारे संकलित* | | | | |

**तक्ता 5.8** मध्ये दर्शविल्याप्रमाणे ऑगस्ट 2024 पर्यंत 30 टक्के कामांचे भौगोलिक चिन्हांकन विविध टप्प्यांवर प्रलंबित होते.

उत्तरादाखल आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी नमूद केले की, तिन्ही टप्प्यांतील प्रलंबित भौगोलिक चिन्हांकन तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित जिल्ह्यांना देण्यात आल्या आहेत.

सप्टेंबर 2025 पर्यंत 27 टक्के कामांचे भौगोलिक चिन्हांकन विविध टप्प्यांवर प्रलंबित असल्याचे लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आले.

## 5.13 साहित्य घटकांवरील दायित्व

नरेगासॉफ्टमध्ये उपलब्ध असलेल्या माहितीनुसार, **तक्ता 5.9** मध्ये दर्शविल्याप्रमाणे राज्यात 2019-20 ते 2023-24 दरम्यान, साहित्यावरील (कुशल मजुरी**,** निम-कुशल मजुरी**,** साहित्य खर्च आणि कर) ₹ 541.92 कोटींचा खर्च प्रदानाकरीता थकीत होता.

**तक्ता 5.9: राज्यातील साहित्यावरील खर्चाचे प्रलंबित दायित्व**

| वर्ष | कुशल आणि निम-कुशल मजुरी | साहित्याची किंमत | कर | एकूण |
|---|---|---|---|---|
| | (₹ लाखांत) | | | |
| 2019-20 | 0.70 | 858.45 | 0 | 859.15 |
| 2020-21 | 17.74 | 871.45 | 0 | 889.19 |
| 2021-22 | 65.20 | 2,523.91 | 0.20 | 2,589.31 |
| 2022-23 | 124.35 | 6,217.46 | 3.91 | 6,345.72 |
| 2023-24 | 282.85 | 43,169.66 | 56.46 | 43,508.97 |
| **एकूण** | **490.84** | **53,640.93** | **60.57** | **54,192.34** |
| *स्त्रोत: नरेगासॉफ्टमधून घेतलेल्या (ऑक्टोबर 2024) विदाच्या आधारे संकलित* | | | | |

**तक्ता 5.9** मध्ये निदर्शनास आल्याप्रमाणे, 2019-20 ते 2023-24 दरम्यान ₹ 541.92 कोटी ऑक्टोबर 2024 पर्यंत प्रदानाकरीता थकीत होते, त्यापैकी ₹ 106.83 कोटी एक ते चार वर्षांच्या कालावधीसाठी थकीत होते. गोंदिया जिल्ह्यात सर्वाधिक

₹ 71.08 कोटी (13 टक्के) थकबाकी असल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले. निवडलेल्या जिल्ह्यांमध्ये 2019-20 ते 2023-24 या कालावधीशी संबंधित ₹ 120.12 कोटींची देयके थकीत होती.

उत्तरादाखल आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी नमूद केले की (जून 2025), साहित्यावरील खर्चासाठी निधी मुक्त करण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला जात आहे.

लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आले की, 2019-20 ते 2023-24 या कालावधीशी संबंधित ऑक्टोबर 2024 पर्यंतचे ₹ 541.92 कोटीचे दायित्व घटून सप्टेंबर 2025 पर्यंत ₹ 216.68 कोटी इतके झाले होते ज्यापैकी ₹ 16.37 कोटी नाकारलेल्या व्यवहारांमुळे आणि बँकांच्या प्रतिसादांसाठी प्रलंबित असलेल्या व्यवहारांमुळे प्रलंबित होते जे परिच्छेद 5.13.1 मध्ये चर्चिले आहे.

## 5.13.1 साहित्याच्या वितरणाचा प्रलंबित खर्च

राज्यात साहित्याच्या वितरणाचा प्रलंबित खर्च **तक्ता 5.10** मध्ये दर्शविण्यात आला आहे.

**तक्ता 5.10: प्रलंबित साहित्य वितरण**

| वर्ष | प्रलंबित साहित्य वितरण खर्च | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पुनर्निर्मितीसाठी प्रलंबित असलेल्या नाकारलेल्या व्यवहारांची संख्या | पुनर्निर्मितीसाठी प्रलंबित व्यवहारांमध्ये समाविष्ट रक्कम (लाखांत) | बँकेच्या प्रतिसादासाठी प्रलंबित असलेल्या नाकारलेल्या व्यवहारांची संख्या | नाकारलेल्या व्यवहारांमध्ये गुंतलेली रक्कम (लाखांत) | नाकारलेल्या व्यवहारांची एकूण संख्या | समविष्ट रक्कम (लाखांत) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6=2+4 | 7=3+5 |
| **2019-20** | 120 | 18.94 | 49 | 5.62 | 169 | 24.56 |
| **2020-21** | 890 | 94.41 | 205 | 28.24 | 1,095 | 122.65 |
| **2021-22** | 1,937 | 163.23 | 1,343 | 159.85 | 3,280 | 323.08 |
| **2022-23** | 1,505 | 210.36 | 1,753 | 764.31 | 3,258 | 974.67 |
| **2023-24** | 1,601 | 404.32 | 1,219 | 335.39 | 2,820 | 739.71 |
| **एकूण** | **6,053** | **891.26** | **4,569** | **1,293.41** | **10,622** | **2,184.67** |

*स्त्रोत: नरेगासॉफ्टवेयरमधून घेतलेल्या (ऑक्टोबर 2024) विदाच्या आधारे संकलित*

**तक्ता 5.10** मध्ये निदर्शनास आल्याप्रमाणे चुकीचे खाते क्रमांक, बंद खाते, गोठवलेले खाते, आधार क्रमांक निष्क्रिय करणे आदी कारणांमुळे ₹ 21.85 कोटींचे 10,622 व्यवहार फेटाळण्यात आले. ₹ 21.85 कोटींपैकी ₹ 14.45 कोटी एक ते चार वर्षे प्रलंबित होती. निवडलेल्या सहा जिल्ह्यांमध्ये ₹ 5.27 कोटीच्या साहित्यावरील खर्चाचे 2,654 व्यवहार फेटाळण्यात आले. या नाकारण्यात आलेल्या व्यवहारांवरील वितरण एकतर

पुनरुज्जीवितासाठी[11] (निधी हस्तांतरण आदेश तयार करणे) प्रलंबित होते किंवा पुनर्निर्मित केले गेले असले तरी बँकेच्या प्रतिसादासाठी[12] प्रलंबित होते.

उत्तरादाखल आयुक्त (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) यांनी नमूद केले की, साहित्य घटकांसाठी निधी मुक्त करण्यासाठी केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला जातो.

लेखापरीक्षणाच्या असे निदर्शनास आले की, सप्टेंबर 2025 पर्यंत 2019-20 ते 2023-24 या कालावधीशी संबंधित ₹ 16.37 कोटींचे 10,917 नाकारलेले व्यवहार वाढले होते.

**निष्कर्ष**

2019-20 ते 2023-24 दरम्यान मंजूर झालेल्या कामांपैकी, 19.57 टक्के कामे अपूर्ण होती तर 27.62 टक्के कामे सुरू ही झाली नव्हती. तसेच, 2019-20 पूर्वी मंजूर झालेली 3.03 लाख कामे अपूर्ण होती. ग्राम पंचायतीत एकावेळी किती कामे हाती घेता येतील याच्या मर्यादेचा अभाव असल्यामुळे अपूर्ण कामांची संख्या वाढत गेली आणि कामे सुरू झाली नाहीत जे नियोजनाचा अभाव व कार्यान्वयनावरील नियंत्रणाचा अभाव दर्शविते.

**शिफारस**

***शिफारस क्र. 6: शासनाने ग्राम पंचायतीत नवीन कामे मंजूर करण्यासाठी विहित तरतुदींचे पालन करण्याचे निर्देश द्यावेत.***

[11] पुनरुज्जीवित म्हणजे निधी हस्तांतरण आदेश तयार करणे.

[12] बँकेचा प्रलंबित प्रतिसाद म्हणजे बँकांकडून व्यवहाराच्या यश किंवा अपयशाची पोचपावती प्रतिक्षित असणे.